-२०३-

शासकीय जमीन वितरण

सैन्य दलातील सेवा पदक धारकांना निवासी व कृषि प्रयोजनासाठी शासकीय जमीन प्रदान करण्याबाबत..

महाराष्ट्र शासन,
शासन निर्णय, क्रमांक: जमीन-१०९९/२४/प्र.क्र.६८६/ज-१,
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई: ४०० ०३२.
दिनांक: १५ मे १९९९

वाचावे :- १) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक:एलएनडी.१०७१/२७५८१०/अ/दोन, दिनांक ३०.१२.१९७१

२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक: संकीर्ण.१०९७/११०२/प्र.क्र.५०/९७/ज-१, दिनांक ८.७.१९९८.

शासन निर्णय :

सन १९७१ चे भारत-पाक युध्दातील तसेच सन १९६२ च्या भारत-चीन युध्दातील व सन १९६५ च्या भारत-पाक युध्द आणि ऑपरेशन पवन या युध्दामध्ये अतुलनीय शौर्य गाजविणा-या/शौर्यपदक प्राप्त करणा-या अथवा जखमी/विकलांग झालेल्या सशस्त्र दलाच्या/सीमा सुरक्षा दलाच्या महाराष्ट्रातील कर्मचा-यांना वा ते मृत्यू पावले असल्यास त्यांच्या कुटूंबियांना ग्रामीण भागात निवासी व कृषि प्रयोजनासाठी शासकीय जमीन प्रदान करण्याचा निर्णय उपरोक्त शासन निर्णयान्वये शासनाने घेतलेला आहे. परंतु सैन्यामध्ये सेवारत असलेल्या किंवा सेवानिवृत्त झालेल्यापैकी ज्यांना प्रशंसनीय सेवा केल्यामुळे परम विशिष्ट सेवापदक, अति विशिष्ट सेवापदक व विशिष्ट सेवापदक प्राप्त झाले आहेत अशा अधिकारी/कर्मचारी यांना लाभ मिळत नसल्यामुळे त्यांचेकडून अशाप्रकारे सवलत मिळावी म्हणून शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत होता. शासनाने त्यांच्या विनंतीवर सहानुभूतिपूर्वक विचार करुन शासन असे निदेश देत आहे की, सैन्यातील ज्यांना वरील नमूद केलेली सेवापदके प्राप्त झाली आहेत असे कर्मचारी/अधिकारी यांना निवासी प्रयोजनासाठी ग्रामीण भागात उपरोक्त दिनांक ८.७.१९९८ च्या शासन निर्णयातील तरतूदींनुसार मंजूर करण्यात येणारे क्षेत्र प्रचलित भावाच्या किंमतीच्या ५० टक्के इतकी रक्कम आकारुन मंजूर करण्यात यावी, त्याचप्रमाणे कृषि प्रयोजनासाठी उपरोक्त दिनांक ३०.१२.१९७१ च्या शासन

पाठविले

जिल्हाधिकारी कार्यालय
रत्नागिरी.

...२/-

निर्णयातील तरतूदींनुसार तेवढे क्षेत्र प्रचलित बाजारभावाच्या किंमतीच्या ५० टक्के किंमत आकारुन मंजूर करण्यात यावी.

२. सदर शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, यांच्या सहमतीने व विधी व न्याय विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ९८७/सिव्हिल/अ, दिनांक १५.४.१९९९ व वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक प्र.क्र.४८०/व्यय-९, दिनांक १९.४.१९९९ ला अनुलक्षून निर्गमित होत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[म.मु. गरदे ]
कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग.